भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

INDIA NON JUDICIAL

TREASURY OFFICE NASIK
R 957012
16 JUL 2014
STPHC

भागीदारी पत्र

महाराष्ट्र MAHARASHTRA

नासिक अ.नं. ६९८८ दि. ५/८/२०१४ रुपये ५००/-

घेणाऱ्याचे नांव [illegible]

पत्ता [illegible]

हस्ते [illegible]

एन. एस. झाडे
स्टॅम्प व्हेंडर (मु.बि.प.क्र.६८/९९)
बुरकुले हॉल जवळ, उत्तमनगर, सिडको, नाशिक.

सही /

NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL

NOTARY Reg. Sr. No. 1867/2014
Pages: 12
Date: 14/08/2014

संस्थेचे एकुण भांडवल रूपये 50,000/- स्टॅम्प रूपये 500/-

|| श्री ||

# भागीदारी पत्राचा दस्तऐवज

सदरचा भागीदारी पत्राचा दस्तऐवज दिनांक १४ माहे ऑगस्ट इसवी सन 2014 रोज गुरु वार ते दिवशी नाशिकरोड मुक्कामी....

NOTARY
Nasik Dist.
Reg.No.3857
GOVT.OF INDIA

1) **श्री. झवेर लिंबाभाई भुवा**
उ. वय. 33 वर्षे, धंदा – व्यापार
राहणार – 1, तुलसी रेसिडेन्सी, अश्विन नगर,
सिडको, नाशिक
येथुन पुढे ज्यांचा उल्लेख **पार्टी नं. 1** असा करण्यात येईल.

**आणि**

2) **श्री. शैलेश विठ्ठलभाई राखोलिया**
उ. वय. 32 वर्षे, धंदा – व्यापार
राहणार – 1, तुलसी रेसिडेन्सी, अश्विन नगर,
सिडको, नाशिक
येथुन पुढे ज्यांचा उल्लेख **पार्टी नं. 2** असा करण्यात येईल.

**आणि**

3) **श्री. अपुल विठ्ठलभाई राखोलिया**
उ. वय. 29 वर्षे, धंदा – व्यापार
राहणार – 1, तुलसी रेसिडेन्सी, अश्विन नगर,
सिडको, नाशिक
येथुन पुढे ज्यांचा उल्लेख **पार्टी नं. 3** असा करण्यात येईल.

**आणि**

4) **श्री. हितेश चंदुलाल राखोलिया**
उ. वय. 26 वर्षे, धंदा – व्यापार
राहणार – 1, तुलसी रेसिडेन्सी, अश्विन नगर,
सिडको, नाशिक
येथुन पुढे ज्यांचा उल्लेख **पार्टी नं. 4** असा करण्यात येईल.

**आणि**

5) **सौ. दक्षा झवेरभाई भुवा**
उ. वय. 32 वर्षे, धंदा – व्यापार
राहणार – 1, तुलसी रेसिडेन्सी, अश्विन नगर,
सिडको, नाशिक

NOTARY
Nashik Dist.
Reg.No.3857
GOVT. OF INDIA

येथुन पुढे ज्यांचा उल्लेख **पार्टी नं. 5** असा करण्यात येईल.

**आणि**

6) **सौ. फाल्गुनी शैलेशभाई राखोलिया**
उ. वय. 30 वर्षे, धंदा – व्यापार
राहणार – 1, तुलसी रेसिडेन्सी, अश्विन नगर,
सिडको, नाशिक
येथुन पुढे ज्यांचा उल्लेख **पार्टी नं. 6** असा करण्यात येईल.

**आणि**

7) **सौ. ऋता अपुलभाई राखोलिया**
उ. वय. 27 वर्षे, धंदा – व्यापार
राहणार – 1, तुलसी रेसिडेन्सी, अश्विन नगर,
सिडको, नाशिक
येथुन पुढे ज्यांचा उल्लेख **पार्टी नं. 7** असा करण्यात येईल.

**आणि**

8) **सौ. नेहा हितेशभाई राखोलिया**
उ. वय. 24 वर्षे, धंदा – व्यापार
राहणार – 1, तुलसी रेसिडेन्सी, अश्विन नगर,
सिडको, नाशिक
येथुन पुढे ज्यांचा उल्लेख **पार्टी नं. 8** असा करण्यात येईल.

**आणि**

9) **सौ. धर्मिष्ठा अरविंदभाई राखोलिया**
उ. वय. 33 वर्षे, धंदा – व्यापार
राहणार – 1, तुलसी रेसिडेन्सी, अश्विन नगर,
सिडको, नाशिक
येथुन पुढे ज्यांचा उल्लेख **पार्टी नं. 9** असा करण्यात येईल.

**आणि**

NOTARY
S. ...HINDE
Nasik Dist.
Reg.No.3967
GOVT. OF INDIA

10) सौ. छाया महेशभाई राखोलिया
उ. वय. 32 वर्षे, धंदा – व्यापार
राहणार – 1, तुलसी रेसिडेन्सी, अश्विन नगर,
सिडको, नाशिक
येथुन पुढे ज्यांचा उल्लेख **पार्टी नं. 10** असा करण्यात येईल.

सदर भागीदार हे आपसांत ठरलेल्या शर्ती व अटी या सदर भारतीय भागिदारी कायदा 1932 प्रमाणे राहतील. आता सदरचे भागीदारी पत्रक हे त्याचा खालीलप्रमाणे पुरावा आहे.

1. **नांव आणि पत्ता :–**

सदरचा भागीदारीचा व्यवसाय **नक्ष डेव्हलपर्स** या नावाने करण्यात येणार असून, भागीदारी व्यवसायाचे नोंदणीकृत कार्यालय : **एएसए–35, अश्विननगर, सिडको, नाशिक – 422009** राहील.

2. **व्यवसायाचे ठिकाण :–**

भागीदारीचा व्यवसाय सध्या **नाशिक** आणि आजुबाजुच्या परिसरात करण्यात येणार असून आवश्यकता भासेल त्याप्रमाणे तो अन्य ठिकाणीही सर्व भागीदारांच्या सहमतीने वेळोवेळी ठरवतील त्या ठिकाणी करण्यात येईल.

3. **व्यवसायाचे स्वरूप :–**

प्रस्तुत भागीदारीचा व्यवसाय जमिनी घेणे, आहे त्या परिस्थितीत विक्री करणे, तसेच जमिनी घेवून त्या विकसीत करणे म्हणजेच प्लॉट पाडणे, त्यावर बांधकाम व्यवसाय करून ते विक्री करणे असा राहील.

4. **नफा–नुकसानीच्या वाटपाचे गुणोत्तर :–**

4.1) **नफा वाटपाचे गुणोत्तर**

भागीदारी व्यवसायातून दरवर्षी होणाऱ्या निव्वळ नफ्याचे वाटप भागीदारांमध्ये खालील प्रमाणात करण्यात येईल.

NOTARY
Shri...SHINDE
Nasnik Dist.
Reg.No.3857
GOVT.OF INDIA



1) श्री. झवेर लिंबाभाई भुवा (पार्टी नंबर 1) – 10 टक्के
2) श्री. शैलेश विठ्ठलभाई राखोलिया (पार्टी नंबर 2) – 10 टक्के
3) श्री. अपुल विठ्ठलभाई राखोलिया (पार्टी नंबर 3) – 10 टक्के
4) श्री. हितेश चंदुलाल राखोलिया (पार्टी नंबर 4) – 10 टक्के
5) सौ. दक्षा झवेरभाई भुवा (पार्टी नंबर 5) – 10 टक्के
6) सौ. फाल्गुनी शैलेशभाई राखोलिया (पार्टी नंबर 6) – 10 टक्के
7) सौ. ऋता अपुलभाई राखोलिया (पार्टी नंबर 7) – 10 टक्के
8) सौ. नेहा हितेशभाई राखोलिया (पार्टी नंबर 8) – 10 टक्के
9) सौ. धर्मिष्ठा अरविंदभाई राखोलिया (पार्टी नंबर 9) – 10 टक्के
10) सौ. छाया महेशभाई राखोलिया (पार्टी नंबर 10) – 10 टक्के

**4.2) नुकसान वाटपाचे गुणोत्तर.**

भागीदारी व्यवसायामधून होणाऱ्या वार्षिक निव्वळ नुकसानीचे (तोटयाचे) वाटप भागीदारांमध्ये खालीलप्रमाणात करण्यात येईल.

1) श्री. झवेर लिंबाभाई भुवा (पार्टी नंबर 1) – 10 टक्के
2) श्री. शैलेश विठ्ठलभाई राखोलिया (पार्टी नंबर 2) – 10 टक्के
3) श्री. अपुल विठ्ठलभाई राखोलिया (पार्टी नंबर 3) – 10 टक्के
4) श्री. हितेश चंदुलाल राखोलिया (पार्टी नंबर 4) – 10 टक्के
5) सौ. दक्षा झवेरभाई भुवा (पार्टी नंबर 5) – 10 टक्के
6) सौ. फाल्गुनी शैलेशभाई राखोलिया (पार्टी नंबर 6) – 10 टक्के
7) सौ. ऋता अपुलभाई राखोलिया (पार्टी नंबर 7) – 10 टक्के
8) सौ. नेहा हितेशभाई राखोलिया (पार्टी नंबर 8) – 10 टक्के
9) सौ. धर्मिष्ठा अरविंदभाई राखोलिया (पार्टी नंबर 9) – 10 टक्के
10) सौ. छाया महेशभाई राखोलिया (पार्टी नंबर 10) – 10 टक्के

**5. हिशोब :–**

भागीदारी व्यवसायाचे हिशोब पहिल्या वर्षी **31 मार्च 2015** रोजी संपविण्यात येणार असून तेथुन पुढे प्रतिवर्षी 31 मार्च रोजी हिशोब पूर्ण करण्यात येतील ज्यावेळी नफा–तोटा पत्रक आणि ताळेबंद मांडण्यात येईल.

NOTARY
S. SHINDE
Nasnik Dist.
Reg.No.3857
GOVT. OF INDIA



6. **बॅकेतील खाती :–**

भागीदारी व्यवसायाच्या नावाने एक किंवा त्यापेक्षा जास्त खाती कुठल्याही बॅकेत उघडण्यात येऊन, ती कोणत्याही भागीदारांच्या सहीने चालविण्यात येतील.

7. **दस्त नोंदणी :–**

भागीदारी व्यवसायाच्या नावाने स्थावर मिळकतीचे खरेदी–विक्री व इतर कोणतेही दस्त नोंदणीकामी कोणत्याही एका भागीदाराच्या सहीने करण्यात येईल.

8. **भांडवल :–**

सदरच्या भागीदारी व्यवसायाचे सुरूवातीचे भांडवल रू. 50,000/– (अक्षरी रूपये पन्नास हजार मात्र) इतके असून, प्रत्येक भागीदाराने नफा नुकसानीचे वाटपाचे टक्केवारी प्रमाणे भांडवल जमा केलेले आहे. भविष्यात जसजशी गरज पडेल त्यावेळी सर्व भागीदारांनी एकमेकांच्या सहमतीने भांडवल आणावयाचे आहे.

9. **वैयक्तिक देणी :–**

कोणत्याही भागीदाराची वैयक्तिक स्वरूपाची देणी देण्याची जबाबदारी भागीदारी व्यवसायावर राहणार नाही.

10. **भांडवलावरील व्याज :–**

सर्व भागीदारांनी आणलेल्या भांडवलाचे स्वतंत्र खाते चालविण्यात येऊन, अशा खात्यावर त्या त्या भागीदाराने आणलेल्या भांडवलावर जास्तीतजास्त दरसाल दरशेकडा 12 टक्के दराने व्याज देण्यात येईल अशा प्रकारे भागीदारांना त्यांच्या भांडवलावर देण्यात येणाऱ्या व्याजाचा दर, सर्व भागीदारांच्या सहमतीने ठरविण्यात येईल.

11. **उचल :–**

पहिल्या हिशोबवर्षाखेरीज दरवर्षी प्रत्येक भागीदारी व्यवसायातून त्याच्या वैयक्तिक खर्चासाठी उचल घेण्यास सर्व भागीदारांची सहमती राहील अशा प्रकारे

G.H.SHINDE
Nashik Dist.
Reg.No.3857
GOVT.OF INDIA



खर्चासाठी उचल करण्यात येणारी रक्कम ही गेल्या वर्षीच्या संबंधित भागीदाराच्या नफ्याच्या हिश्यापेक्षा जास्त असणार नाही.

12. **पगार :–**

येथे सर्वानुमते असे मान्य करण्यात येते की, कार्यकारी भागीदार हे पगार घेण्यास लायक राहतील आणि कार्यकारी भागीदारांना देण्यात येणाऱ्या पगाराचा आयकर कायद्याच्या सेक्शन 40 मधील कलम (बी) अंतर्गत सब सेक्शन (अ) अनुसार दिलेल्या हिशोबाच्या पद्धतीप्रमाणे करण्यात येईल.

13. **पगाराची गणना :–**

सध्याच्या प्रचलित पध्दतीनुसार कार्यकारी भागीदारांना देण्यात येणाऱ्या पगाराची गणना खालील प्रमाणे केली जाईल.

| | | |
|---|---|---|
| अ) | पहिल्या रूपये 3,00,000/– पुस्तकी नफा किंवा नुकसान असल्यास | 1,50,000/– किंवा पुस्तकी नफ्याच्या 90 टक्के यापैकी जी जास्त असेल ती रक्कम |
| ब) | बाकी पुस्तकी नफ्यावर | 60 टक्के दराने |

येथे सर्व भागीदार आपसातील सहमतीने प्रत्येक वर्षाची त्यांच्या पगाराची रक्कम अथवा टक्केवारी ठरवतील. येथे असेही मान्य करण्यात येते आहे. की वर उल्लेख केलेल्या आयकर कायद्यानुसार गणना करावयाच्या पध्दतीमध्ये जर काही सुधारणा करण्यात आली तर ती सुधारणा अंमलात आल्याच्या तारखेपासून जर इतर भागीदारांनी अन्य कोणतीही पध्दती सुचवली नाही तर, सदर भागीदारीपत्रामध्येही अंमलात आणली जाईल.

14. **भागीदारीचा कालावधी :–**

सदर भागीदारीचा कालावधी ऐच्छिक राहील.

15. **विघटन :–**

एखाद्या भागीदाराच्या निवृतीच्या अथवा मृत्युच्या प्रसंगी या भागीदारीचे विघटन, जर इतर भागीदारांची इच्छा भागीदारी व्यवसाय पुढे सुरु ठेवण्याची असेल तर, होणार नाही.

NOTARY
G.N. SHINDE
Nasnik Dist.
Reg.No.3857
GOVT. OF INDIA



16. **भागीदाराची निवृत्ती अथवा मृत्यू प्रसंगी :—**

जर भागीदारी व्यवसायातून कोणा एखाद्या भागीदाराची निवृत्ती होण्याची इच्छा असेल तर अशा प्रसंगी निवृत्ती होऊ इच्छिणाऱ्या भागीदाराने इतर भागीदरांना एक महिन्याची लेखी नोटीस देऊन त्याचा भागीदारी व्यवसायातून निवृत्ती होण्याचा मनोदय जाहीर केला पाहिजे. अशा प्रकारे निवृत्ती होऊ इच्छिणारा भागीदारी किंवा मयत भागीदाराचे वारस यांना, भागीदाराच्या निवृत्तीच्या अथवा मृत्युच्या तारखेपर्यंत त्या भागीदाराच्या नावावर भांडवल खात्यावर जमा असलेल्या रकमेइतकीच रक्कम, भागीदारी व्यवसायाच्या नफा अथवा नुकसानीचा त्या भागीदाराचा हिस्सा जमा – नावे केल्यानंतर मिळण्याचा हक्क राहील. निवृत्ती होणाऱ्या भागीदाराच्या निवृत्तीनंतर त्याच्या भांडवल खात्याचा हिशोब करुन, भागीदारी व्यवसायाच्या नफा – नुकसानीप्रमाणे त्याला देय असलेली किंवा त्याच्याकडून घेणे असलेली रक्कम जमा – नावे करुन जर काही शिल्लक रक्कम भागीदाराला देय असेल तर अशी रक्कम भागीदारी व्यवसायाच्याआर्थिक पारस्थितीनुसार जेव्हा शक्य असेल तेव्हा किंवा वेळोवेळी देण्यात येईल.

17. **लवाद :—**

भागीदारी व्यवसायातील भागीदारांमध्ये कोणत्याही व्यावसायिक गोष्टीबाबत तंटा निर्माण झाल्यास अशा प्रसंगी त्रयस्थ इसमाची लवाद म्हणून सर्वानुमते नेमणूक करण्यात येऊन, वादातील गोष्टी लवादासमोर निर्णयासाठी मांडण्यात येतील. दोन्ही बाजुंचे म्हणणे ऐकूण घेतल्यानंतर त्रयस्थ लवाद जो काही निर्णय देईल तो सर्व भागीदारांवर बंधनकारक राहील. इतर बाबतील काही तंटा उदभवल्यास, आर्बिटरेशन अॅक्ट, 1940 च्या तरतुदी बंधनकारक राहतील.

18. **नवीन प्रवेश :—**

कोणाही व्यक्तिला भागीदार म्हणून नव्याने प्रवेश द्यायचा झाल्यास त्यासाठी सर्व भागीदारांची संमती आवश्यक राहील आणि अशा प्रकारे नवीन प्रवेश केलेल्या भागीदाराच्या भागीदारी व्यवसायाबाबतच्या अटी आणि शर्ती हया सर्व भागीदार आपसातील संमतीने ठरवतील.

G.R. SHINDE
Nashik Dist.
Reg.No.3857
GOVT.OF INDIA



19. भागीदारी व्यवसायातील सर्व भागीदार एकमेकांशी प्रामाणिकपणे आणि व्यवसायाशी सचोटीने, परिश्रमपूर्वक आणि निष्ठेने राहतील व सर्व कारभार न्यायानं व श्रध्देने आणि भागीदारी संस्थेच्या हितार्थ चालवतील.

20. **कर्ज :—**

सर्व भागीदारांच्या संमतीने भागीदारी संस्थेस व्यवसायाच्या आवश्यकतेनुसार वेळोवेळी विविध बँकांकडून, वित्त पुरवठा करणाऱ्या संस्थांकडून, इसमांकडून कर्ज उभारणी करता येईल.

21. **हिशोबाची पुस्तके :—**

सदर भागीदारी व्यवसायाची कायद्यानुसार आवश्यक असलेली हिशेबाची पुस्तके विहित पध्दतीने ठेवण्यात येतील आणि ती भागीदारी व्यवसायाच्या नोंदणीकृत कार्यालयात ठेवण्यात येतील. कोणाही भागीदारास काही कारणाने सदरची पुस्तके पाहावयाची असल्यास, त्यातील खातेउतारे लिहून घ्यायचे असल्यास तो ते करू शकेल.

भागीदारी व्यवसायाची नफा — तोटा पत्रके आणि ताळेबंद तयार झाल्यानंतर त्यावर प्रत्येक भागीदाराची ते मान्य असल्याबद्दल सही असेल. एकदा अशा प्रकारे नफा — तोटा पत्रके आणि ताळेबंदावर भागीदारांनी सहया केल्यानंतर सदरचे हिशोब पुर्ण झाल्याचे समजण्यात येऊन ते सर्व भागीदारांवर बंधनकारक असतील आणि त्याबाबत कोणत्याही भागीदाराची कोणत्याही प्रकारची तक्रार ऐकून घेतली जाणार नाही. जर कोणाही भागीदाराने लबाडीने काही अपरिहार्य गोष्टी केल्या असतील तर त्याची दखल सही केल्या पासून तीन महिन्याच्या कालावधीत तक्रार केल्यास घेतली जाईल आणि अशा प्रकारच्या चुकांची दुरुस्ती करण्यात येईल.

22. प्रत्येक भागीदार हा त्याने भागीदारीच्या सर्वसाधारण व्यवसायासाठी संस्था तोटयात जाऊ नये म्हणून केलेल्या अत्यावश्यक वैयक्तिक खर्चाच्या व जबाबदारीच्या भरपाईस पात्र राहील. सदर खर्च व जबाबदारी जर व्यवसायाच्या दृष्टीने आणीबाणीच्या अथवा तातडीच्या कारणासाठी अथवा भागीदारी संस्थेच्या

NOTARY
G.N. SHINDE
Nasik Dist.
Reg.No.3957
GOVT.OF INDIA



हितासाठी व नुकसानीपासून संस्था वाचविण्यासाठी अथवा तत्सम कारणासाठी केला असेल व सदरहू पुढील येणाऱ्या वार्षिक ताळेबंदामध्ये देय असेल व सदर रक्कम ताळेबंद केल्यापासून तीन महिन्यात देण्यात यावी. अशा रकमेच्या वसुलीसाठी भागीदारीच्या विसर्जनाची मागणी न करता सदर भागीदार लवादाकडे जाऊ शकेल.

23. प्रत्येक भागीदार त्याच्या व्यवहाराने अथवा हेतुपुरस्कर दुर्लक्षामुळे संस्थेस तोटा येणार नाही यादृष्टीने सर्वसाधारणपणे व्यवहार करेल.

24. सर्व भागीदारांच्या सहमतीने सदरच्या दस्तऐवजातील अटी व शर्तीमध्ये सुधारणा करता येईल परंतु अशा प्रकारे सुचविण्यात आलेल्या आणि अंमलात येणाऱ्या सुचना जर लेखी स्वरूपात नसतील आणि त्यावर सर्व भागीदारांच्या सहया नसतील तर त्या रद्दबातल ठरतील एकदा लेखी स्वरूपाच्या सुधारणांवर सर्व भागीदारांनी सहया केल्यावर त्या सुधारणा हया दस्तऐवजाचा एक भाग ठरतील.

25. हया भागीदारी पत्राच्या तारखेपूर्वी केलेल्या कोणाही भागीदाराच्या वैयक्तिक आर्थिक वा इतर व्यवहारांसाठी भागीदारी व्यवसाय उत्तरदायी असणार नाही तसेच भागीदारी व्यवसायाशी संबंधित व्यवहारांव्यतिरिक्तच्या अन्य व्यवहारांसाठीही उत्तरदायी असणार नाही. भागीदारी व्यवसाय कोणाही भागीदाराच्या वैयक्तिक व्यवहारांसाठी उत्तरदायी असणार नाही.

26. कोणाही भागीदार भागीदारी व्यवसायाशी संबंधित कोणत्याही प्रकारचा बोजा त्याच्या स्वतःच्या लाभात इतर भागीदारांची संमती असल्याशिवाय तबदील करणार नाही.

27. या भागीदारी पत्रात उल्लेख न केलेल्या इतर बाबी भारतीय भागीदारी कायद्याप्रमाणे तसेच तरतुदीनुसार किंवा त्यावेळी अस्तित्वात असलेल्या कायद्यानुसार ठरवल्या जातील.

NOTARY
G.N. SHINDE
Nashik Dist.
Reg.No.3857
GOVT.OF INDIA



आम्ही सर्वांनी वर उल्लेख केलेल्या अटी व शर्ती वाचून समजून घेतल्या आहेत आणि त्या सर्वार्थाने बरोबर असून त्या आम्हा सर्वांवर बंधनकारक आहेत.

हया दस्तऐवजातील अटी व शर्ती आम्हा सर्वांवर बंधनकारक आणि आम्हाला मान्य असल्याबद्दल आम्ही सर्व भागीदारांनी आपापल्या सहया या दस्ताच्या तारखेला साक्षीदारांसमक्ष केल्या आहेत.

1) श्री. झवेर लिंबाभाई भुवा ..............



2) श्री. शैलेश विठ्ठलभाई राखोलिया S.V. Rukholiya ..............



3) श्री. अपुल विठ्ठलभाई राखोलिया ..............



4) श्री. हितेश चंदुलाल राखोलिया ..............



5) सौ. दक्षा झवेरभाई भुवा



6) सौ. फाल्गुनी शैलेशभाई राखोलिया F.S Rukholiya ..............



Before Me

Adv. G.N. Shinde
NOTARY

NOTARY
G.N.SHINDE
Nashik Dist.
Reg.No.3857
GOVT.OF INDIA

7) सौ. ऋता अपुलभाई राखोलिया R.A. Rakholiya ..............



8) सौ. नेहा हितेशभाई राखोलिया Neha ..............



9) सौ. धर्मिष्ठा अरविंदभाई राखोलिया D.A Rakholiya ..............



10) सौ. छाया महेशभाई राखोलिया C.M. Rakholiya ..............



नोटरी समक्ष सर्व भागीदारांनी ह्या भागादारीपत्रावर सहया केलेल्या आहेत.

Witness,

Nitin D. Shinde.

Before Me

Adv. G.N. Shinde